| MHKO050025552022 | **म.सं.कौ.हि. का. क्र. ७८/२०२२ मधील नि.२७ खालील आदेश** | **वर्षा देसाई<br>वि.<br>अमित देसाई** |
|---|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने वि.प. यांचा बचाव रद्द (defence struck off) करण्याचा आदेशाकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये नि.५ च्या अर्जावर केलेल्या आदेशानुार वि.प. यांनी अर्जदार यांना देय असलेली रक्कम रू.८,५५,०००/- पोटगीची रक्कम जाणीवपुर्वक थकविलेली आहे. वि.प. यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत संपन्न असून देखील वि.प. हा जाणीवपुर्वक पोटगीची रक्कम देणचे टाळत आहे. त्यामुळे अर्जदार यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असून त्यांना भटके आयुष्य जगण्याची वेळ आली आहे. अर्जदार या रिकाम्या पोटी कायदयाची लढाई लढणेस असमर्थ आहेत. सबब, अशास्थीतीत वि.प. यांचा या कामातील बचाव रद्द होणे न्यायोचीत आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा.

३. प्रस्तुत अर्जास वि.प. यांनी त्यांचे असे म्हणणे दाखल केले की, अर्जदार यांनी दिलेला अर्ज हा पी.डब्ल्यु.डी.व्ही.३२/२०२४ या कामी रक्कम जमा केली नाही याकरिता दिला आहे. वास्तविक पाहता सदरचे काम व पी.डब्ल्यु.डी.व्ही.३२/२०२४ हे दोन वेगवेगळे प्रकरण असल्याने सदरचा अर्ज अर्जदार यांना या प्रकरणामध्ये देता येणार नाही. सदरचे काम हे दि.२८/०६/२०२३ पासून अर्जदार यांनी पुरावा देणेकरिता ठेवलेला आहे. सदर तारखेपासून आजपावेतो २ वर्ष ८ महिने२७ दिवस झालेले आहेत. त्यांनी सदर प्रकरणामध्ये पुरावा दिलेला नाही. यावरून सदरचे अर्जदार या केवळ वि.प. यांना

त्रास देण्याच्या उद्देशाने याकामी दिरंगाई करीत आहेत. सबब, अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने महिला कौटुंबिक हिंसाचारा कायदा अन्वये दाखल केला आहे. प्रस्तुत कामी अर्जदाराचा दरम्यानची पोटगी मिळावी म्हणून अर्ज दि.२३/०५/२०२३ रोजी मंजूर झालेला आहे. त्यानंतर अर्जदाराने पोटगीची रक्कम वसुल व्हावी म्हणून याच न्यायालयामध्ये किरकोळ अर्ज नं.३२/२०२४ हा दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, रजनेश वि. नेहा या न्यायनिवाडयाप्रमाणे अर्जदाराची वि.प.कडे थकबाकी राहिलेली आहे ती अर्जदाराला मिळणे अपेक्षित आहे. वि.प. कडून रू.८,५५,०००/– येणे बाकी आहे. अर्जदाराची परिस्थिती हलाकीची असून वि.प.ची परिस्थिती चांगली आहे. अर्जदार ही रिकामी पोटी कायदयाची लढाई लढण्यास असमर्थ आहे. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार अंतर्गत कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम १२(५) प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज हा चौकशीला लागल्यापासून ६ महिन्याच्या आत न्यायनिर्णय होणे अपेक्षित आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार हिने दि.२३/०५/२०२३ पासून सरतपास दिलेला नाही. प्रस्तुतच्या अर्जामध्ये वि.प. यांने रक्कम भरली नाही म्हणून वि.प.चा बचाव रद्द करता येणार नाही. शिवाय रजनेश वि. नेहा च्या न्यायनिर्णयाप्रमाणे अंतरिम पोटगीची वसुलीकरिता मार्गदर्शन तत्वे जारी केलेली आहेत. त्याप्रमाणे अर्जदाराला फौ.किरकोळ अर्ज क्र. ३२/२०२४ मध्ये वि.प. विरूध्द स्टेप्स घेता येतील परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदाराने तिचा पुरावा देणे आवश्यक आहे. अर्जदाराने सदरचे प्रकरण चौकशीस लागल्यापासून २ वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये तिचा पुरावा दाखल केलेला

नाही. अर्जदाराने सदरच्या अर्जामध्ये तिचा पुरावा न दिल्यास अर्जदाराविरूध्द योग्य तो आदेश पुढील तारखेस पारीत केला जाईल. अर्जदाराच्या अर्जामध्ये वि.प.चा बचाव रद्द करण्याजोगी कोणतीही परिस्थिती अगर कारण दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराच्या अर्जामध्ये तथ्य दिसून येत नाही. सबब, सदरचा अर्ज हा नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश पारीत करतो.

**आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. अर्जदारास निर्देशित करण्यात येते की, अर्जदाराने पुढील तारखेस पुरावा न दिल्यास योग्य तो आदेश पारीत केला जाईल.

३. उभयंतांनी याची नोंद घ्यावी.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.04.21 13:22:24 +0530

**दिनांक– २१/०४/२०२६**
**इचलकरंजी.**

**(डी. बी. साठे)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**